## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३३८१/२०२२

**अपिलार्थी, श्रीम.श्रध्दा विनायक परब,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, प्लॉट क्र.२७/२८,
सेंट लॉरेन्स हायस्कूल समोर, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विभागीय सहसचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १९.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.०८.२०२२ | -- | २९.०८.२०२२ | १९.१०.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. २१.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "*माहिती अप्राप्त* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १९.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ज्योत्स्ना शिंदे-पवार, विभागीय सचिव तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.हेमलता बच्छाव, वरिठ अधिक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, वाशी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" श्रीमती काळे शकुंतला, सेवानिवृत्त अध्यक्ष डॉ.अशोक भोसले, सेवानिवृत्त सचिव, राज्य मंडळ श्री.पाटील के.बी., तत्कालीन विभागीय अध्यक्ष श्री.श्रद खंडागळे, सेवानिवृत्त विभागीय सचिव, श्री.संदिप संगवे, तत्कालीन सहसचिव/विभागीय सचिव यांच्या अधिपत्याखाली मुंबई विभागीय मंडळामध्ये आर्थिक घोटाळा व त्या अनुषंगाने भ्रष्टाचार झालेला आहे त्या अनुषंगाने झालेल्या भ्रष्टाचार पाठीशी घालणाऱ्या संबंधितावर कोणतीही कार्यवाही न करता पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने कार्यवाही सुरु आहे तसेच याचा भ्रष्ट, मनमानी कारभार यास जबाबदार आहे. मुंबई विभागीय मंडळ कार्यलयातील भ्रष्टाचार, अनियमितता, लैंगिक शोषण, बहिष्कार टाकणे, वाळीत टाकणे, अन्य विभागीय मंडळात बदली करणे अशा कायदेभंग केलेल्या संबंधित सर्वांना पाठीशी घालून पाठींबा देऊन संबंधितास सहकार्य करुन माझा छळ करण्यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग आहे. मुंबई विभागीय मंडळ कार्यालयात एकूण १३ चौकशी समिती गठीत करण्यात आल्या परंतु एकाही चौकशी समितीकडून कायद्याने लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देणे अनिवार्य, बंधनकारक असतानाही सदर बाबत कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. सबब लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने एकूण १३ चौकशी समिती नेमण्यात आलेल्या आहेत. त्या समित्यांनी दिलेल्या अहवालाच्या प्रती व कागदपत्रे आपणास देण्यात आलेले नाहीत. ज्या दि.११.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्याबाबत नमूद केले आहे. प्रत्यक्षात त्या पत्रान्वये आपणास माहिती दिलेली नसून, सदर अहवालाच्या प्रती उपलब्ध नाहीत असे कळविण्यात आले आहे.

उपस्थित असलेल्या प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२६.०८.२०२२ रोजी वस्तुस्थितीदर्शक माहिती कळविली होती. त्यावेळी अहवालाच्या प्रती उपलब्ध नव्हत्या. मात्र त्यानंतर अपिलार्थी यांना कार्यालयात बोलावून सर्व माहिती देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सी.सी.टी.व्ही फुटेज हे उपलब्ध नसलेबाबत भांडार शाखेने कळविल्याप्रमाणे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या सोयीचे दिनांक कळवून संबंधित नस्तीचे अवलोकन देणे योग्य होईल. तसेच अवलोकनाअंती ज्या कागदपत्रांची अपिलार्थी मागणी करतील ती कागदपत्रे त्यांना विनामुल्य पुरविणे योग्य होईल. तसेच पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत. याबाबतचा खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुढील १५ दिवसांच्या कालावधीत त्यांच्या सोयीचे दिनांक कळवून संबंधित नस्तीचे अवलोकन देणे योग्य होईल. तसेच अवलोकनाअंती ज्या कागदपत्रांची अपिलार्थी मागणी करतील ती कागदपत्रे त्यांना विनामुल्य पुरविणे योग्य होईल.
२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत. याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ जानेवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक, भांडार शाखा,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**- यांना प्रत**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी,
नवी मुंबई ४०० ७०३.**यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०४.०५.२०२६ ( In Continuation of order dt.१९.०१.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.१९.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांना सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय मनोहर कापसे, वरीष्ठ अधीक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी यांनी आयोगाकडे कोणताही अहवाल सादर केलेला नाही. त्यांच्या अहवालासाठी सदर प्रकरण पुढील दिनांकावर ठेवण्यात येत. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी यांनी पुढील सुनावणीस उपस्थित राहून आयोगाच्या दि.१९.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा अहवाल सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ मे, २०२६ .

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

